**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**

Maharashtra Housing & Area Development Authority

**जनसंपर्क विभाग**

कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com


===============================================================

जावक क्रमांक – ४५४/६ दिनांक :- ०१ फेब्रुवारी, २०२४

प्रसिद्धिपत्रक

## 'म्हाडा'मध्ये १३ फेब्रुवारी रोजी लोकशाही दिनाचे आयोजन

मुंबई, दि. ०१ फेब्रुवारी, २०२४ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणामध्ये (म्हाडा) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित 'म्हाडा लोकशाही दिन' या महिन्यात मंगळवार, दि. १३ फेब्रुवारी, २०२४ रोजी म्हाडाच्या वांद्रे पूर्व येथील गृहनिर्माण भवनातील चौथ्या मजल्यावरील सभागृहात 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आला आहे. संबंधित अर्जदारांनी याची नोंद घेण्याचे आवाहन म्हाडा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

नवीन वर्षापासून प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी 'म्हाडा लोकशाही दिन' आयोजित करण्यात येत आहे. दि. ८ जानेवारी, २०२४ रोजी पहिल्या लोकशाही दिनामध्ये १५ अर्ज प्राप्त झाले. या सर्व अर्जदारांचे म्हणणे ऐकून घेत संबंधित अर्जदारांच्या अर्जाबाबत तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित लोकशाही दिंनांतर्गत सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी/अडचणी यांची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून निराकरण करण्यात येत आहे. म्हाडा लोकशाही दिनासाठी अर्ज विहित नमुन्यात असणे आवश्यक असून त्याचे प्रपत्र १ 'अ' ते प्रपत्र 'ड' हे नमुने म्हाडाच्या https://mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यानुसार अर्जदाराची तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे असावे, तसेच अर्जदाराने अर्ज विहित नमुन्यात १४ दिवस अगोदर दोन प्रतींत पाठवणे आवश्यक आहे. नागरिकांना तात्काळ निर्णय देणे सुलभ व्हावे याकरिता विषयाशी निगडित संबंधित विभाग/मंडळ प्रमुख देखील हजर राहणार आहेत. तसेच म्हाडा लोकशाही दिनातील नागरिकांकडून प्राप्त झालेल्या अर्जाची पोच पावती दिली जाणार आहे.

न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/अपील्स, सेवाविषयक, आस्थापना विषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे /देण्यात येणार आहे अशा प्रकरणाची पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज, तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे नसेल असे अर्ज म्हाडा लोकशाही दिनात स्वीकारले जाणार नाहीत. जे अर्ज लोकशाही दिनाकरिता स्वीकृत करता येऊ शकणार नाहीत असे अर्ज संबंधित विभागाकडे आवश्यक कारवाईसाठी आठ दिवसात

पाठवण्यात यावे व त्याची प्रत अर्जदारास पृष्ठांकित करणे गरजेचे आहे. दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी होणाऱ्या लोकशाही दिनाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतर येणारा कामकाजाचा दिवस म्हाडा लोकशाही दिन म्हणून पाळण्यात येईल. तसेच निवडणुकीकरता आचारसंहिता लागू केलेली असेल त्यावेळी म्हाडा लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येणार नाही.

###

मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

-----